विषयः -**छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यानाचे (Adventure Park) संचलन, कार्यान्वयीन व देखभाल दुरुस्ती कामी रॉयल्टी तत्वावर एजन्सीची नियुक्ती करणे बाबत..**
- पात्रताधारक एजन्सी यांनी महानगरपालिकेस देय Maximum रॉयल्टी रक्कमेचे दरपत्रक सादर करणे बाबत.

**प्रकल्प विवरण**

छत्रपती संभाजीनगर शहराच्या मध्यभागी स्थित, हडको एन-10 येथील स्वामी विवेकानंद उद्यान, रोझ उद्यान व लगतचा परिसर मिळुन City Central Park विकसीत करण्याचे नियोजन आहे. प्राप्त शासन निधी मधुन City Central Park मध्ये छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान (Adventure Park) विकसीत करण्यात आले आहे. उद्यानात विविध प्रकारच्या साहसी उदा. ट्रॅम्पोलाईन पार्क, झिपलाईन, सस्पेन्शन ब्रिज, हाय रोप कोर्स, स्काय सायकल, स्काय रोलर, लो रोप कोर्स, क्लंबिंग वॉल, रेकींग बॉल इत्यादी व इतर खेळांचा समावेश आहे. सदर खेळांसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने उपभोग शुल्क/तिकीट आकारणी केली जाते.

उद्यानाची देखभाल दुरुस्ती व संचलन कामी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) द्वारे रॉयल्टी तत्वावर एजन्सी नियुक्त करण्याची (B-2 E-Tender मार्फत) कार्यवाही महानगरपालिकेने प्रस्तावीत केली आहे. सदरचा प्रकल्प हा महानगरपालिकेसाठी नाविण्यपुर्ण आहे. EOI साठी महानगरपालिकेस देय किमान आधारभुत रॉयल्टी रक्कम निश्चित करावयाची आहे. करीता विविध एजन्सी प्राप्त दरमहा उत्पन्नाच्या किती टक्के (Maximum) रॉयल्टी महानगरपालिकेस देऊ शकेल यासाठी दरपत्रके मागवित आहेत. प्रकल्पात अंतर्भूत बाबी खालील प्रमाणे आहेत.

१. प्रकल्पाचा कालावधी:- कार्यादेश पासुन पुढील 15 वर्षे (मंजुरीच्या अधीन)
२. निविदा रक्कम (विना परतावा):- रुपये १२००/-
३. इसारा रक्कम (विना व्याजी परतावा) :- रुपये ५०००/-
४. सुरक्षा अनामत रक्कम, कार्यादेश पुर्वी (विना व्याजी परतावा):- रुपये २,५०,०००/-
६. एजन्सी/कंत्राटदार/संस्थे करीता पात्रता निकष:- व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र
कामगारांचे पी.एफ., ईएसआयसी रजिस्ट्रेशन
ATOAI नोंदणी प्रमाणपत्र
IMF नोंदणी प्रमाणपत्र

**प्रकल्पाच्या अटी शर्ती :**

1) पात्र निविदाधारक/एजन्सी यांनी महानगरपालिकेय देय केलेल्या रॉयल्टी रक्कमेत कार्यादेशाच्या दिनांक पासुन पुढील पाच वर्षांनी 30% वाढ करण्यात येईल. तसेच कार्यादेशाच्या दिनांक पासुन पुढील दहा वर्षांनी महानगरपालिकेय देय केलेल्या रॉयल्टी रक्कमेत 50% वाढ करण्यात येईल.

2) छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग, तंत्रज्ञ, खेळणी चालक, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी संबंधीत एजन्सीधारकास स्वखर्चाने नियुक्त करावे लागतील.

3) नियुक्त एजन्सीला छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडुन स्वतंत्र वीज जोडणी घेऊन, नवीन वीज मिटर बसविणे आणि त्याचे देयक नियमितपणे भरणा करावे लागेल.

4) छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान प्रकल्पाद्वारे प्राप्त होणा-या उत्पन्नापोटी शासनाच्या नियमानुसार संबंधीत एजन्सीला सक्षम कार्यालयाकडे मनोरंजन कर भरावा लागेल.

5) पात्र एजन्सीने कार्यादेशाच्या दिनांका पासुन प्रवेश फी (टिकीट) संबंधीचा दैनंदिन लेखाजोखा (हिशोब) ठेवावा व दर महिन्याच्या एक तारखेला (सुट्टीचा दिवस वगळून) महानगरपालिकेस रॉयल्टी भरावी.

6) छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान विविध खेळांसाठी महानगरपालिकेने निश्चित केलेले खालील प्रमाणे उपभोग शुल्क/तिकीट दरानुसार आकारणी करणे नियुक्त एजन्सीला बंधनकारक राहील. खेळांचे उपभोग शुल्क/तिकीट दर कमी-जास्त करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहील.

| Sr. No. | Activity | Rate for Adults (Rs.) | Rate for Kids (Rs.) |
|---|---|---|---|
| 1. | Entry Fee | 10/- | 10/- |
| 2. | Zipline | 100/- | 50/- |
| 3. | Sky Cycle | 50/- | 25/- |
| 4. | Sky Roller | 50/- | 25/- |
| 5. | Suspension Bridge 4 No's | 100/- | 50/- |
| 6. | High Rope Course 17 Activities | 100/- | 50/- |
| 7. | Low Rope Course 17 Activities | 50/- | 25/- |
| 8. | Climbing Wall | 50/- | 25/- |
| 9. | Trampoline Park 20 min | NA | 100/- |
| 10. | Wrecking Ball 10 Minutes | 50/- | 25/- |
| 11. | Net Climbing | NA | Complimentry |
| 12. | Pole Climbing | NA | Complimentry |
| 13. | Rope Climbing | NA | Complimentry |
| 14. | Big Swing | NA | Complimentry |
| 15. | Sky Way | NA | Complimentry |
| 16. | Slippery Wall | NA | Complimentry |
| 17. | Rope Slider | NA | Complimentry |
| | Total Rs. | 560/- | 385/- |
| | **Package Cost** | **500/-** | **350/-** |

7) छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान प्रकल्पाची जागा, प्रकल्पातील विविध साहसी खेळ, त्याची उपांगे यावर नियुक्त एजन्सीचा कोणताही हक्क राहणार नाही/सांगता येणार नाही किंवा दावा करता येणार नाही.

8) छत्रपती संभाजी महाराज साहसी उद्यान प्रकल्पाच्या जागेत एजन्सीला कोणताही जोडधंदा/व्यवसाय/ व्यापार/उपक्रम सुरु करता येणार नाही.

9) संभाजी महाराज साहसी उद्यान प्रकल्पातील विविध साहसी खेळ व त्यांच्या उपागांची मोड-तोड, नुकसान किंवा चोरी झाल्यास नियुक्त एजन्सीला त्याची भरपाई द्यावी लागेल/स्वखर्चाने त्याच स्पेसिफिकेशनचे साहित्य खरेदी करावे लागेल.

10) प्रकल्पातील खेळण्यांचा उपभोग घेणा-या मुलांचा/व्यक्तिचा/पर्यटकांचा विमा उतरविणे/घेणे बंधनकारक राहील. प्रकल्प प्रत्यक्षात सुरु करणे/ताबा घेणे पुर्वी विम्याची प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

11) प्रकल्पातील उपांगे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करणे, पोटभाडेकरु ठेवणे, सहभागीदार ठेवणे, बक्षीस, गहान ठेवणे इत्यादी बाबी करता येणार नाही.

12) एजन्सीधारकाकडुन नियुक्त कामगारांचा विमा, पीएफ व ईएसआयसी हा नियमानुसार भरणा करावा लागेल.

13) सविस्तर अटी/शर्ती निविदेत नमुद असतील.

मुख्य उद्यान अधिकारी
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर.

Signed by Vijay Bapusaheb Patil
Date: 16-07-2025 15:22:02